REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 8 | MAY - 2018

# जागतिकीकरण आणि शिक्षण




डॉ. उज्ज्वला दा. लोणकर
प्राचार्य , शारदाबाई पवार महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शारदानगर.तालुका: बारामती. जिल्हा : पुणे.

## प्रस्तावना :

जागतिकीकरण हि एक विश्व व्यापक संकल्पना आहे. प्राचीन ऋषी परंपरेला अभिप्रेत असणारी "विश्व बंधुत्व" अर्थात "हे विश्वची माझे घर" ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्याचे कार्य जागतिकीकरणाने शक्य झाले आहे. जगातील कानाकोप–यातील माहिती अगदी काही क्षणात जगभरात पोहचवली जाऊ लागली. शिक्षण क्षेत्रावरही जागतिकीकरणाचे परिणाम दिसत आहेत.जगातील विविध ठिकाणी असणारे अभ्यासक्रम कोणालाही शिकण्याचे स्वातंत्र्य प्राप्त झाले ते जागतिकीकरणमुळेच. विविध ज्ञानशाखांचे भांडार उपलब्ध झाले ते जागतिकीकरणामुळेच.जागमिकीकरणत शिक्षणक्षेत्रात विधायक बदलांच्या दृष्टिने ऊर्जा न लावता जसे घाव बसत गेले,तसे वळण प्राप्त होत गेले.त्याचे अनुकूल–प्रतिकूल परिणाम शिक्षणक्षेत्रावर दिसत आहेत.

जागतिकीकरणचा उदय : भारतात 1990 च्या सुमारास जागतिकीकरणास सुरूवात झाली.1991 साली जॉर्ज बुश अमेरिकेचे अध्यक्ष असताना नव्या जागतिक व्यवस्थेचा विचार मांडण्यात आला आणि त्यातून जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सुरूवात झाली.जगातील विकसनशील व अविकसित राष्ट्रांनी आपल्या विकासासाठी आयात–निर्यात व परकिय भांडवलावर निर्बंध लावले.यावर मार्ग काढण्यासाठी प्रगत राष्ट्रांनी भांडवलाचा मुक्त संचार आणि बाजारपेठांचा विस्तार या दोन प्रमुख बाबी नजरेसमोर ठेऊन जागतिकीकरणाचे धोरण पुढे आणले.

## जागतिकीकरण अर्थ व व्याख्या :

जागतिकीकरणची सुरूवात प्रामुख्याने आर्थिक क्षेत्रात झाली. आर्थिक बदलातून अनेक सामाजिक,सांस्कृतिक व राजकिय बदल घडून नवी व्यवस्था अस्तित्वात आली. या व्यवस्थेच्या प्रभावापासून कोणताही देश अलिप्त राहिला नाही.देशादेशामध्ये होणा–या व्यापाराच्या मुक्त प्रवाहातील तांत्रिक ज्ञानावरील व गुंतवणुकीवरील संरक्षणात्मक अडथळे दूर करणे म्हणजे जागतिकीकरण. वेगवेगळया शब्दात देशाचे उराराच्पादन व्यापार आणि वित्तीय व्यवहाराच्या बाबतीत इतर विकसित देशांसोबत आंतरक्रिया म्हणजे जागतिकीकरण होय.

**हेराड, टाथेल आणि रॉबर्ट :–** जागतिकीकरण ही आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे एका काल्पनिक विश्व अर्थ व्यवस्थेकडे होणारे संक्रमण,दर्शविणारी संकल्पना आहे.

**एडवर्ड हार्मन :–** जागतिकीकरण ही सीमापार उत्पादने, भांडवल सेवा आणि आर्थिक क्रिया प्रक्रियांच्या वाढत्या प्रवाहाला लक्ष करणारी प्रक्रिया आहे.

**जागतिकीकरणाचा शिक्षणाशी संबंध** : जागतिकीकरणाचा संबंध आर्थिक क्षेत्राबरोबर मर्यादित न राहता इतर क्षेत्राशी विकसित करण्यासाठी झाला. ही संकल्पना शिक्षणक्षेत्राशी लागू पडते.याचा विचार करताना आशय, समानसंधी,बुध्दीमत्ता व आंतरराष्ट्रीय सामंजस्य साकडे लक्ष ठेवावे लागते.

जगतिक स्पर्धेला समर्थपणे सामोरे जाणारे मनुष्यबळ तयार करणे हे शिक्षणाच्या जागतिकीकरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यासाठी पात्र व्यक्तीची निवड व त्याचे उच्च दर्जाचे प्रशिक्षण या गोष्टी आवश्यक आहेत. जागतिकीकरणाला आधुनिक माहिती तंत्रज्ञानावर व शिक्षण पध्दतींवर तसेच विविध विषयांतील ज्ञानात्मक माहितीवर प्रभाव दिसून येतो.आजच्या काळात अभ्यासक्रम अद्ययावत ठेवण्यासाठी तसेच त्यात आवश्यक ते बदल करण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाची मदत अनिवार्य झाली आहे. आज युरोपातील ब–याच शिक्षणसंस्था भारतात अथवा इतर देशांत आपल्या शैक्षणिक उभ्या करत आहेत. आज एका देशाकडे असलेले ज्ञान दुस–या देशाला मिळू लागले आहे.शिक्षणाची देवाण–घेवाण मोठया प्रमाणावर सुरू असलेली आपणास दिसून येते.

जागतिक व्यापार संघटनेच्या मते, फक्त भारतातच नव्हे तर संपूर्ण जगातील उच्चशिक्षणात पूर्णपणे आंतरराष्ट्रीयत्व जागतिकीकरणामुळे अपरिहार्य झाले आहे.

**शिक्षणातील जागतिकीकरणाचे स्वरूप :–**

1. एखाद्या देशातील विद्यार्थी त्याच्याच देशात राहून इतर देशातील विद्यापीठात प्रवेश घेऊन आपला अभ्यास पूर्ण करतो.
2. एखाद्या देशातील विद्यार्थी दुस–या देशात प्रत्यक्ष जाऊ तेथील विद्यापीठात प्रवेश घेऊन तेथील अभ्यासक्रम पूर्ण करतो व पदवी घेतो.
3. बाहेरच्या देशातील विद्यापीठे ही दुस–या देशात जाऊन त्यांच्या स्वतःच्या **Teaching Faculty, Curriculume, Intrastructure** इ.सुविधा पुरवितात.परंतु इतर लाभ घेणारे विद्यार्थी मात्र बाहेरील असतात.

**शिक्षणातील जागतिकीकरणाची व्याप्ती :–** **GATTS** आणि **Education** या 1994च्या कराराद्वारे शिक्षणामध्ये विकासात्मक स्वरूप देण्याचा प्रयत्न झाला.त्यामुळे शिक्षण ही एक सेवा बनली व ती सेवा **GATTS** च्या अंतर्गत येते.सध्याच्या काळात शिक्षण हे महत्वाचे आहे. त्यामुळे यातून फायदेशीर गोष्टी माणवास प्राप्त होत असतात. याचा अर्थ असा की,सध्या शिक्षणास एक बाजारपेठ मिळाली आहे. शिक्षण ही एक सेवा असली तरी जागतिकीकरणाच्या या युगात सर्व ठिकाणी स्पर्धा चालु आहे. जगातील इतर व्यापाराशी शिक्षण ही स्पर्धा करीत आहे व ती ठामपणे टिकूण आहे. **GATTS P** या करारानुसार मिळालेल्या संमतीवरून शिक्षण हे सर्व स्तरांवरती खुले आहे.यातून शिक्षणात विविध कौशल्ये व त्याबरोबर गुणवत्ताही दिली जात आहे. **WTO** द्वारे शिक्षणातील सेवा या पाच भागात विभागल्या आहेत. 1. प्राथमिक शिक्षण. 2.माध्यमिक शिक्षण. 3. उच्च शिक्षण. 4. प्रौढ व निरंतन शिक्षण. 5.इतर शिक्षण प्रक्रिया (व्यावसायिक)

भारतात मुबलक प्रमाणत उच्चशिक्षणाचा विकास होण्यासाठी योग्य प्रकारच्या सोयी उपलब्ध नाहीत. उदा. पायाभूत सुविधा, अभ्यासक्रम, शिक्षक,वर्ग इ. बाबत कमतरता असल्याने भारत उच्चशिक्षणात मागे असल्याचे दिसून येते.याचे कारण गुणवत्ता त्यामुळे भारतातील बुध्दिवंत वर्ग भारताच्या बाहेर उच्चशिक्षणात अथवा पुढे आपल्या बुध्दीचा उपयोग इतर देशांच्या प्रगतीसाठी करतो. शिक्षणक्षेत्र हे खुप व्यापक आहे की परिस्थितीनुसार सुधारणा, बदल करून थांबता येत नाही. येथे सुधारणा, व्याप्ती यांना विराम नाही. सतत नवनवे बदल, सुधारणा होत राहणार. व्याप्ती वाढत जाणार नवीमते मांडली जाणार.ही प्रक्रिया अखंडपणे चालु राहणार.

## जागतिकीकरणामुळे शिक्षणापुढे उभी राहणारी आव्हाने :

जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्या अनेक आव्हानांबरोबरच शिक्षणतील शिक्षण पक्रियेची गुणवत्ता वाढविणे हे एक आव्हानच आहे.

आव्हाने : अ) शिक्षक : ▪ प्रशिक्षण. ▪ अध्यापन पध्दती. ▪ संशोधन. ▪ कौशल्य . ▪ अद्ययावत तंत्रज्ञान. ▪ आंतरशाखीय दृष्टिकोन.

शैक्षणिक संस्था : ▪ व्यवस्थापन. ▪ भौतिक सुविधा. ▪ मानवी सुविधा. ▪ अद्ययावत तंत्रज्ञान. ▪ आर्थिक स्त्रोत. अभ्यासक्रम. ▪ प्रवेश व परीक्षा. ▪ गुणवत्ता व्यवस्थापन.

विद्यार्थी : ▪ अभ्यासक्रम. ▪ अध्यापन पध्दती. ▪ भाषा व कौशल्ये. ▪ तंत्रज्ञान. ▪ व्यवसायसंदर्भात. ▪ जीवनकौशल्य. ▪ प्रवेश व परीक्षा.

वरीलप्रमाणेच मूल्यांची आव्हानेही जागतिकीकरणामध्ये आहेत. ती पुढीलप्रमाणे.

1. सांस्कृतीक मुल्ये. 2. सामाजिक मूल्ये. 3. राजकिय मूल्ये.

## शिक्षणाच्या जागतिकीकरणाचे फायदे :

1. आंतरराष्ट्रीय सामंजस्याला चालना मिळेल व राष्ट्राराष्ट्रात सुसंवाद वाढेल.
2. लोकांना त्याच्या आवडीनुसार, गरजेनुसार शिक्षण घेता येईल.
3. शिक्षणात गुणवत्तेला अधिक महत्व येईल.
4. शिक्षणाच्या प्रसाराला बाधक असणा—या अटी नष्ट होऊन शिक्षणाचा विस्तार झपाटयाने होईल.
5. बहुमार्गी संप्रेशन व आंतरक्रिया या बहुसांस्कृतीक विकासात मदत होईल.
6. निकोप स्पर्धा वाढुन शिक्षणाचे क्षेत्र अधिक प्रगत होईल.
7. नवी तंत्रे,नवी ज्ञान पध्दती जगभर पोहचून शिक्षणाचा दर्जा सुधारेल.
8. स्थानिक पातळीवर विद्यार्थ्यांच्या बरजांचा विकास होणार आहे.
9. गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाल्यामुळे व्यवसायाच्या नोकरीच्या संधी विद्यार्थ्यांनस प्राप्त होतील.
10. स्माजातील प्रत्येकाला ज्ञान मिळविण्याची संधी प्राप्त होईल.

## शिक्षणाच्या जागतिकीकरणाचे तोटे :

1. जगातील काही देशातीलच संस्कृतीचे व मुल्यांचे इतर देशावर वर्चस्व निर्माण होईल.
2. वंचित, दुबळे व स्त्रिया यांच्या शिक्षणाला मर्यादा पडतील.
3. सामाजिक, आर्थिक, भौगोलिक असमानता वाढुन कलह वाढण्याची शक्यता निर्माण होऊ शकते.
4. शिक्षण महाग झाल्याने सर्वसामान्य जनतेला शिक्षण मिळणार नाही.
5. जागतिकीकरणामुळे खाजगीकरणाला चालना मिळेल.
6. गरिब व श्रीमंत यांच्यातील दरी वाढेल.
7. शिक्षणातून प्रचंड शोषण केले जाईल.काळया पैशाची उलाढाल करणा—या क्षेत्रामध्ये शिक्षणाचाही समावेश होईल.
8. स्थानिक उत्पादनाचे स्त्रोत नष्ट होऊन स्थानिक सुस्कृतीचाही नाश होऊ शकतो.
9. निकोप व्यापाराला,भागीदाराला विकसित व अविकसित देशातील तंत्रविज्ञानातील अडथळे निर्माण होतील.

## समारोप :

सद्याचे युग हे ज्ञानाच्या उद्योगाचे आहे. अर्थव्यवस्था चालविणारी सर्व बौध्दिक संपदा शिक्षणक्षेत्रातून निर्माण होत असल्याने त्याचा मोबदला घेण्याचा अधिकार शिक्षण क्षेत्राला निश्चितच आहे.शिक्षणक्षेत्राचा अधिकार असलेला मोबदला समाजाकडून शिक्षणक्षेत्राला मिळवून देण्श्सचे काम

सरकारचे आहे, मसे केले तर शिक्षणक्षेत्र निर्भर होईल. जागतिकीकरणाने आज सर्वच देशांमध्ये प्रवेश केला आहे. शिक्षणामध्ये तो मोठयाप्रमाणत आहे. भारतासारख्या विकसनशील देशाने स्पर्धेत टिकून राहण्यासाठी शिक्षणसंस्था, विद्यार्थी व शिक्षक या तीनही घटकांना आव्हानच आहे. ते आव्हान स्विकारून त्याचा सामना केला पाहिजे. सरकारने उच्च शिक्षणावर खर्च करायला हवा हे आपल्या देशातील वास्तव्य आहे. हा खर्च अर्थव्यवस्थेवर बोजा नसून उलट अर्थव्यवस्थेला उपकारक ठरणारा आहे. कारण जागतिकीकरणाच्या स्पर्धेच्या जगात ' सुशिक्षित भारतीय युवक ' या एकमेव घटकामुळे भारताचे खास स्थान निर्माण झाले आहे. शिक्षणावरील खर्चाला अनुदान न म्हणता भविष्यातील तरतूद समजली पाहिजे.जागतिकीकरणामुळे शिक्षणाचा प्रसारच होत आहे.त्यातून गुणवत्तापूर्ण शिक्षणप्रक्रिया होत आहे..

## समारोप :

जागतिकीकरणाच्या लाटेत जागं व्हायच आपल्याला भावी पिढी घडविण्यासाठी. यासाठी मनात कठोर जिद्द हवी आणि या जिद्दीला प्रामाणिक प्रयत्नांची जोड मिळायला हवी.

## संदर्भ


- डॉ. अरविंद दुनाखे, (2009),शिक्षक प्रशिक्षण,पुणे,नित्यनूतन प्रकाशन.
- डॉ.ह.दा. जगताप,(2006),शिक्षणातील नवप्रावाह व नवप्रवर्तने,पुणे, नित्यनूतन प्रकाशन.
- डॉ.दादासाहेब इंगळे,(2009),जागतिकीकरण भारतरपुढील आव्हाने,पुणे, धम्मधिका प्रकाशन.
- https://mr.m.wikipedia.org